महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.deptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसुचना/ ५५ /२०२२ दि. ०८/०८/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी**,दिनांक ११/०८/२०२२ रोजी **"नारळी पोर्णिमा"** सणानिमीत्त ठाणे शहरात कळवा खाडीवरील पुल परिसरात ( कोर्टनाका ते क्रिक नाका व शिवाजी चौक) नारळी पोर्णिमेच्या दिवशी ठाणे शहरातील नागरीक कळवा खाडीमध्ये नारळ टाकण्यासाठी मोठया संखेने उपस्थित राहतात. त्यादरम्यान सदर परिसरातील वाहतुक सुरळीत व सुनिश्चित रहावी, या करीता आम जनतेच्या साईसाठी,

**त्याअर्थी**, मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १, ठाणे शहर अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर, म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून आम जनतेच्या **सोयीसाठी** खालील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे :–

| | |
|---|---|
| **प्रवेश बंद–** | १) जुना कळवा खाडी पुल सुरक्षेच्या कारणास्तव सर्व प्रकारच्या वाहतुकीस बंद ठेवण्यात आल्या प्रमाणे वाहतुकीस बंद राहील. |
| **प्रवेश बंद–** | २) कळवा क्रिक नाका बाजुकडुन उर्जिता हॉटेल मार्गे पोलीस कवायत मैदाना समोरील रोडने कोर्टनाक्याकडे जाणा–या व सिडको स्टॅन्ड कडे जाणा–या वाहनांना उर्जिता हॉटेल येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने हि क्रिकनाका – उर्जिता हॉटेल येथून उजवे वळण घेवून कारागृह वसाहत बाजुकडून, आर.टी.ओ. कार्यालयाचे समोरुन जी.पी.ओ.येथुन इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ३) सिडको कडून कळवा क्रिकनाक्याकडे जाणा–या वाहनांना **दादोजी कोंडदेव स्टेडीयम** येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सिडको स्टॅन्ड कडून कळवा बाजुकडे जाणारी वाहने दादोजी कोंडदेव स्टेडीयम समोरून अे वन फर्निचर मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ४) साकेत रोडने सिडकोकडे जाणा–या टी.एम.टी, एन.एन.एम.टी.बसेस (पुर्णा व पंचगंगा) यांना क्रिकनाका कडे जाण्यास राबोडी वाहतुक उपविभाग कार्यालयासमोर **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | सदरची वाहने साकेत रोडने सिडको कडे जाणा–या टी.एम.टी.बसेस हया क्रिकनाका येथे न येता राबोडी वाहतुक उप विभाग कार्यालय समोरून युटर्न घेवून पुन्हा साकेत मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ५) नवी मुंबई परिवहन सेवेच्या बसेस व कंपनीच्या बसेस हया कळवा पुल मार्गे सिडको स्टॅन्डकडे व इतर ठिकाणी जाण्यास ग्रीन वर्ल्ड, पटनी येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–**<br>**पर्यायी मार्ग–** | अ) सदरच्या बसेस ग्रीन वर्ल्ड, पटनी येथे प्रवासी उतरवून तेथुनच परत जातील.<br>ब) टी.एम.टी.बसेस हया कळवा आगार येथुन व एस.टी.बसेस हया खोपट एस.टी.वर्कशाप येथुन सुटतील आणि प्रवाशी भरुन आनंदनगर जकात नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ६) ठाणे शहरातून कळवा पुल मार्गे नवी मुंबईकडे जाणा–या सर्व प्रकाराच्या लक्झरी बसेस, एस.टी बसेस व खाजगी कंपनीच्या बसेस यांना कॅडबरी सिग्नल, खोपट येथुन **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | ठाणे शहरातुन कळवा पुल मार्गे नवी मुंबईकडे जाण्या–या लक्झरी बसेस या शहरातुन न जाता पुर्व द्रुतगती मार्गे (हायवे) रोडने गोल्डन डाईज नाका–टोल नाका–पारसिक नाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ७) गोल्डन डाईज नाक्याकडुन जीपीओ मार्गे क्रिकनाक्याकडे जाणा–या चारचाकी व त्यावरील चाके असलेल्या सर्व प्रकारच्या वाहनांना गोल्डन डाईज नाका येथे **"प्रवेश बंद"** करण्यात येत आहे. |
| **पर्यायी मार्ग–** | अ) गोल्डन डाईज नाक्याकडुन क्रिकनाक्याकडे येणा–या कंपनी बसेस या गोल्डन डाईज–क्रिक नाक्याकडे न जाता कोपरी ब्रिज–आनंदनगर नाका मार्गे व साकेत ब्रिज खारेगांव टोलनाका मार्गे इच्छित स्थळी जातील. |
| **प्रवेश बंद–** | ८) कळवा–विटावा जकात नाका,पारसिक सर्कल,बाळकुम जकात नाका येथुन साकेत व गोल्डन डाईज नाका मार्गे कळवा बाजूकडे येणा–या सर्व प्रकारच्या जड–अवजड वाहनांना प्रवेश बंद करण्यात येत आहे. |

CamScanner

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही फायरब्रिगेड,रूग्णवाहिका,पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागु राहणार नाही.

**सदरची अधिसुचना ही दिनांक ११/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजे पावुन २४.०० वा. पर्यंत अमलात राहिल.**

(दत्तात्रेय कांबळे)
पोलीस उप आयुक्त,मुख्यालय ०१,ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी,ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका,ठाणे./नवी मुंबई
–पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१,ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा,ठाणे
–पोलीस उप आयुक्त,वाहतुक विभाग,नवी मुंबई

**प्रत कार्यवाहीसाठी :–**
–उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे./नवी मुंबई
परिवहन व्यवस्थापक,ठाणे महानगरपालिका,ठाणे,/नवी मुंबई/बृहन्मंबई
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/नवी मुंबई

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे,ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व पो.निरी. ठाणेनगर,राबोडी,कापुरबावडी,कळवा वाहतूक उपविभाग ठाणे.

CamScanner